दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १४५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.०६ जानेवारी २०२५




## महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या तत्परतेने आग आटोक्यात



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, पनवेल :** जय भारत नाक्यावरील आदित्य देवदास बिल्डिंग येथे दिनांक ३ जानेवारीच्या रात्री २ च्या सुमारास तळमजला तसेच पहिला व दुसरा मजला या ठिकाणी आग लागलेली होती. पनवेल महापालिकेच्या दोन अग्निशमन दलाने होजरील होजच्या साह्याने कुलिंगचे काम केले. बिल्डिंगला लॅडर लावून बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावर आग लागलेल्या लकी बॅग्स दुकानातील साहित्य बाहेर काढून कुलिंगचे काम केले. तसेच बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या जेष्ठ नागरिक, मुले महिला अशा एकूण ११ रहिवाशांना रेस्क्यू करून सुखरूप बिल्डिंगच्या खाली आणले.

घटनास्थळी अग्निशमन केंद्र अधिकारी हरिदास सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली लिडिंग फायरमन वैभव ओंबसे, मंदार म्हात्रे व नवीन पनवेल अग्निशमन दलाचे वाहनाच्या माध्यमातून कर्मचारी यांनी तत्परतेने आग विझवल्याने मोठी दुर्घटना टळली. आदित्य देवदास बिल्डिंग मुख्य बाजार पेठेत असून वेळेत पालिकेचे अग्निशमन दल पोहोचल्याने पुढील मोठी हानी टळली. त्यामुळे उपस्थित नागरिकांनी पनवेल मनपा अग्निशमन दलाचे कौतुक केले. यावेळी पनवेल शहर पोलीस स्टेशनचे कर्मचारी व माजी नगरसेविका नीता माळी उपस्थित होत्या.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका नागरिकांना सेवा व सुविधा देण्यासाठी तत्पर असून महापालिकेचा अग्निशमन दल अधिक बळकट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला जात आहे.

## बार मालकाच्या गळ्याला चाकू लावला अन...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, बुलडाणा :** चिखली पोलीस ठाण्याचे ठाणेदार संग्राम पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी समीर आणि डुबल्या हे रात्री नऊ वाजताच्या सुमारास चिखली शहरातील राज वाईन बारमध्ये गेले. यावेळी बारच्या गल्लूयावर मालक सुनील सखाराम अप्पा जिरवणकर हे बसले होते. या दोघांनी चाकू जिरवणकर यांच्या गळ्याला लावून आरडा ओरड केल्यास चाकू ने भोसकण्याची धमकी दिली. यानंतर गल्लूयातील अकराशे आणि खिश्यातील नऊशे रुपये हिसकावून पळ काढला.

दरम्यान, जिरवणकर यांनी घटनेची माहिती चिखली पोलिसांना दिली. दोघे आरोपी गुंड प्रवृत्तीचे असल्याने आणि त्यांची चिखलीमध्ये दहशत वाढत आहे. यामुळे ठाणेदार संग्राम पाटील यांनी त्यांच्या तपासासाठी एक पथक गठीत केले. त्यांना रात्री उशिरा जेरबंद करण्यात आले. त्यांच्याकडून चाकू आणि दोन हजार रोख जप्त करण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर केंद्रे, यासह पोलीस कर्मचारी शरद भागवतकर, समाधान वडणे, आदी पोलिसांनी ही कारवाई केली. रात्री वाईन बारमध्ये आलेल्या दोघांनी मालकाच्या गळ्याला चाकू लावला व ओरडला तर चाकूने भोसकण्याची धमकी देत गल्लूयातील रक्कम घेऊन पळ काढला. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहरात हा थरारक घटनाक्रम घडला. या घटनेनंतर फरार झालेल्या व चिखलीमधील गौरक्षण वाडीमध्ये दडून बसलेल्या दोघा आरोपींना पोलिसांनी रात्रभरातून अटक केली आहे. सैय्यद समीर सैय्यद जहीर आणि विशाल राजेश उर्फ डुबल्या अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता दोन हजार तेवीसच्या विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले. शनिवारी, पाच जानेवारी रोजी त्यांना चिखली न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली असून दोघा आरोपींची जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

## सोयाबीन नोंदणीस मुदतवाढ, दर हमीभावापेक्षा कमी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, अमरावती :** सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत ६ जानेवारीपर्यंत वाढवण्याचा निर्णय पाच दिवसांपूर्वी सरकारने घेतला खरा, पण त्याचा काहीच परिणाम बाजारावर जाणवलेला नाही. दरांमध्ये घसरण सुरूच आहे. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी किमतीत सोयाबीन विकावे लागत आहे. गेल्या आठवडाभरात सोयाबीनचे दर १२० रुपयांनी घसरले आहेत.

किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीनची खरेदी ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल या हमीभावाने सुरू आहे. यापूर्वी ३१ डिसेंबरपर्यंत सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत होती. आता नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि 'एनसीसीएफ' यांच्यामार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार आहे. पण, अजूनही सरकारी खरेदीला गती मिळालेली नाही. ओलाव्याचे प्रमाण आणि इतर अनेक अटींमुळे हमीभाव खरेदी केंद्रापेक्षा खुल्या बाजारात सोयाबीन विक्री करण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. शनिवारी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत ७ हजार ३४७ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. किमान ३ हजार ८५० तर कमाल ४ हजार रुपये म्हणजे सरासरी ३ हजार ९२५ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. गेल्या २८ डिसेंबर रोजी ३ हजार ७०५ क्विंटल आवक झाली होती, तर सरासरी ४ हजार ४७ रुपये दर मिळाला होता. म्हणजे आठवडाभरात सोयाबीनच्या दरात १२२ रुपयांची घसरण झाली आहे. पश्चिम विदर्भातील इतर बाजार समित्यांमध्ये देखील हीच स्थिती असून सोयाबीनचे दर चार हजारांपेक्षा कमीच आहेत.

# मला मतं दिली म्हणजे, माझे मालक झालात का?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, बारामती :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे नेहमी राज्याच्या राजकारणात चर्चेत असतात. मात्र, याच स्पष्टवक्तेपणामुळे कधी-कधी अजित पवार अडचणीत आल्याचंही पाहायला मिळतं. गेल्या काही महिन्यांपासून राज्याच्या राजकारणात अजित पवार हे केंद्रबिंदू ठरले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेल्या फुटीनंतर बारामती राज्याच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणातही चर्चेत राहिली. लोकसभेची निवडणूक आणि त्यानंतर विधानसभेच्या निवडणुकीतही सर्वांच्या नजरा या बारामतीकडे लागल्या होत्या. विधानसभेच्या निवडणुकीनंतर अजित पवार पुन्हा एकदा महायुतीच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले आहेत.

दरम्यान, महायुती सरकारच्या हिवाळी अधिवेशनानंतर अजित पवार परदेश दौऱ्यावर गेले होते असं सांगितलं जात होतं. आता परदेश दौऱ्यावरून आल्यानंतर अजित पवार आज बारामतीच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी मतदारसंघातील विविध विकास कामांचं उद्घाटन केलं. बारामतीमधील मेडद या ठिकाणी बारामती तालुका खरेदी विक्री संघाच्या परिसरामधील एका नवीन पेट्रोल पंपाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते पार पडले. याचवेळी बोलत असताना अजित पवार कार्यकर्त्यांवर संतापल्याचे पाहायला मिळाले.



**अजित पवार भर सभेत संतापले !**

### नेमकं काय घडलं?

एका पेट्रोल पंपाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात बोलत असताना अजित पवार यांना नागरिकांकडून कामाच्या संदर्भातील निवेदन दिले जात होते. त्यानंतर अजित पवारही ते निवेदन घेत कामे मार्गी लावण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देत होते. मात्र, याचवेळी एका कार्यकर्त्याने अनेक कामे झाले नसल्याचं म्हटलं. त्या कार्यकर्त्याच्या विधानानंतर अजून काही नागरिकांनीही तसंच म्हटलं. यानंतर अजित पवार हे काहीसे संतापले आणि म्हणाले, अरे तुम्ही मला मतं दिली म्हणजे माझे मालक नाही झालात. मला सालगडी केलंय का?, अशा शब्दांत अजित पवारांनी त्या कार्यकर्त्यावर संताप व्यक्त केला.

### अजित पवारांच्या विधानावर मंत्री शिरसाट यांची प्रतिक्रिया

काही वेळेला असं होतं की लोकप्रतिनिधी काम करत असताना काही मतदार देखील आपण काही तारतम्य न ठेवता थेट हे काम झालंच पाहिजे असा आग्रह करतात. त्यावेळेला एखाद्यावर रागावणं हे सहाजिक आहे. एखादा लोकप्रतिनिधी उलट बोलला तर त्याची बातमी होते. पण एखादा नागरिक बोलला तर त्याची बातमी होत नाही. कदाचित अजित पवार यांनी रागाच्या भरात ते वक्तव्य केलं असावं, असं शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.

# शिर्डीतील भाजपचे अधिवेशन ऐतिहासिक करु : राधाकृष्ण विखे पाटील

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, शिर्डी (अहिल्यानगर) : जिल्ह्यामध्ये महायुतीला मिळालेल्या विजयाप्रमाणेच शिर्डीमध्ये पक्षाचे होत असलेले अधिवेशन ऐतिहासिक करुन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतही जिल्ह्यामध्ये शतप्रतिशत भाजपाच्या विजयाचा निर्धार करण्याचा संकल्प करु, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.**

भारतीय जनता पक्षाचे राज्यस्तरीय अधिवेशन येत्या १२ जानेवारी रोजी शिर्डी येथे होत आहे. या अधिवेशनास पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील मान्यवर नेते उपस्थित राहणार आहेत. राज्यात महायुतीची सत्ता स्थापन झाल्यानंतर आणि भारतीय जनता पक्षाला प्रथम क्रमांकाने मिळालेल्या जागा या सर्व वातावरणात शिर्डीमध्ये होत असलेले अधिवेशन अधिक उत्साहाने करण्याचा निर्णय पक्षाच्या प्रदेश कार्यकारणीने घेतला आहे. या पार्श्वभूमीवर शिर्डी येथे अधिवेशनाची नियोजन आढावा बैठक झाली.

या बैठकीस ना. राधाकृष्ण विखे पाटील, पक्षाचे महामंत्री आ. विक्रांत पाटील, आ. शिवाजीराव कर्डीले, महामंत्री विजयराव चौधरी, राजेश पांडे, रवी अनासपुरे, माधवी नाईक, डॉ. सुजय विखे पाटील, स्नेहलता कोल्हे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग यांच्यासह जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या राज्यस्तरीय अधिवेशनास पक्षाचे सुमोर वीस हजार प्रतिनिधी उपस्थित राहतील अशा पध्दतीचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी बैठकीत विविध समित्या गठीत करण्यात आल्या. या समित्यांकडे




अधिवेशनातील विविध विभागांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, विजयराव चौधरी,रवी अनासपुरे यांनी या बैठकी समित्यांना मार्गदर्शन करून अधिवेशनाचे नियोजन चांगल्या प्रकारे करण्याचे आवाहन केले. ना. विखे पाटील म्हणाले, पक्षाच्या राज्यस्तरीय नेत्यांनी या अधिवेशनाचे यजमानपद शिर्डीला दिल्याबद्दल आभार व्यक्त करून हे अधिवेशन न भूतो न भविष्यती अशा पद्धतीने आम्ही यशस्वी करु, विधानसभा निवडणुकीत महायुतीला ज्या पद्धतीने विजय मिळविला तसेच हे अधिवेशन सुद्धा ऐतिहासिक करण्याचा प्रयत्न जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते करतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. पक्षाच्या सर्व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी राज्यातून येणाऱ्या प्रतिनिधींच्या निवासस्थानाचे, भोजन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था याचे नियोजन करून अधिवेशनाच्या प्राथमिक तयारीवर शिक्कामोर्तब केले आहे.

# भारत WTC फायनलच्या रेसमधून बाहेर ! "बॉर्डर गावस्कर ट्रॉफी" मालिकेत भारत पराभूत !

## ऑस्ट्रेलिया वि. दक्षिण आफ्रिकेत रंगणार WTC चा अंतिम सामना !

ऑस्ट्रेलियाने सिडनी कसोटीत भारताचा ६ विकेट्सने पराभव करत मालिका ३-१ ने जिंकली. यासह भारताने तब्बल १० वर्षांनी भारताला पराभूत करत बॉर्डर गावस्कर ट्रॉफीवर नाव कोरलं आहे. यासह ऑस्ट्रेलियाने सलग दुसऱ्यांदा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (WTC) अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे, जिथे आता त्यांचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. डब्ल्यूटीसीचा अंतिम सामना ११ ते १५ जून दरम्यान लॉर्ड्सवर खेळवला जाईल. यासह भारतीय संघाचं वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचं स्वप्न भंगलं आहे.



टीम इंडियाला ही कसोटी मालिका बरोबरीत संपवण्यासाठी कोणत्याही किंमतीत हा सामना जिंकावा लागणार होता, पण अवघ्या तीन दिवसांतच टीम इंडियाला हा सामना गमवावा लागला. या पराभवाचा जागतिक कसोटी चॅम्पियनशिपवरही परिणाम झाला आहे. आता फायनलमध्ये पोहोचण्याच्या टीम इंडियाच्या सर्व आशा संपल्या आहेत. भारत आता २०२३-२५ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. शर्यतीत कायम राहण्यासाठी टीम इंडियाला ही मालिका कोणत्याही परिस्थितीत बरोबरीत संपवावी लागली. मात्र ती तसे करण्यात अपयशी ठरली. म्हणजेच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या इतिहासात ही पहिलीच वेळ असेल जेव्हा टीम इंडियाशिवाय अंतिम सामना खेळवला जाईल.

यासह वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या इतिहासात ही पहिलीच वेळ असेल जेव्हा टीम इंडिया अंतिम सामना खेळणार नाही. याआधी दोन्ही वेळा भारतीय संघाने फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले होते. पण यावेळी टीम इंडियाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप सायकलमध्ये विशेष काही करता आले नाही. ऑस्ट्रेलियाबरोबरच भारतातच खेळली गेलेली न्यूझीलंडविरुद्धची कसोटी मालिकाही भारताने पूर्वी गमावली होती. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ ची सुरुवात टीम इंडियाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या २ सामन्यांच्या कसोटी मालिकेने केली होती. भारतीय संघाने ही मालिका १-० ने जिंकली. यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळलेली २ सामन्यांची कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत राहिली. यानंतर टीम इंडियाचा सामना इंग्लंडशी झाला. टीम इंडियाने ही मालिका ४-१ ने जिंकली. यानंतर २ कसोटी सामन्यांच्या मालिकेतही बांगलादेशचा २-० असा पराभव केला. मात्र त्यानंतर न्यूझीलंडविरुद्धच्या ३ सामन्यांच्या मालिकेत ०-३ असा पराभव पत्करावा लागला आणि आता ऑस्ट्रेलियाविरुद्धही पराभव पत्करावा लागला.


टीम इंडिया अपात्र ठरल्यामुळे आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ चा अंतिम सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात होणार आहे. दक्षिण आफ्रिकेने आधीच फायनलमध्ये आपले स्थान पक्के केले होते आणि आता ऑस्ट्रेलियानेही फायनलसाठी पात्रता मिळवली आहे. गतवर्षीचा चॅम्पियन ऑस्ट्रेलिया आहे.

# संपादकीय

## दर्पणकार

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे म राठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्म दिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे वृत्तपत्र सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणा पासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेम णूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पहिले वर्तमानपत्र सुरू केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक वर्तमानपत्र होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या वर्तम ानपत्राच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# पत्रकारिता : लोकशाहीचा चौथा स्तंभ. !!




६ जानेवारी हा राज्यातील पत्रकारितेच्या दृष्टीने महत्वाचा मानला जातो, जगात, देशात किंवा म हाराष्ट्रात पत्रकारितेचा मोठा इतिहास आहे. दरवर्षी ३ मे रोजी जागतिक पत्रकार दिवस तर १६ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय प्रेस डे म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी १८३२ साली आद्य पत्रकार कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी त्यांच्या जन्मदिनी दर्पण नावाचे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले, त्यांच्या सन्मानार्थ महाराष्ट्र सरकारने आजचा दिवस पत्रकार दिन म्हणून घोषित केला. भारतीय पत्रकारितेचा इतिहास खुप जुना आहे १७७६ मधे भारतात इंग्रजी पहिल्यांदा वृत्तपत्र प्रकाशित झाले. वृत्तपत्र आणि अलीकडच्या काळातील इलेक्ट्रॉनिक मिडिया च्या माध्यमातून समाजाला ज्ञान, खेळ, क्रिडा, करमणूक, सामाजिक घडामोडींची माहिती, समाजातील वाईट, चुकीच्या प्रथा, परंपरा, यावर भाष्य करणे, 'राजा तु चुकला' असे परखड मत मांडत समाजाच्या जागल्या च्या भुमिकेतुन वृत्तपत्रे आणि मिडिया काम करत असतात,आणि यात महत्त्वाची भूमिका बजावतात ते पत्रकार. यामुळेच वृत्तपत्रे आणि अलीकडच्या काळातील इलेक्ट्रॉनिक मिडिया हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखला जातो. आजवर समाजाच्या, देशाच्या वाटचालीत पत्रकारितेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे आणि आजही बजावत आहे. मात्र याच पत्रकारितेवर मोठे प्रश्नचिन्ह देखील निर्माण झाले आहे, आणि इतर श्त्रेत्राप्रमाणे पत्रकारितेत देखील काही दुष्प्रवृत्तीं शिरल्या आहेत मात्र आजही जनता पत्रकारितेकडे अपेक्षेने पहाते. समाजाला दिशा देण्यात, अन्यायाला वाचा फोडण्याचे, न्यायाच्या बाजुने रहाणारे आजही अनेक पत्रकार आपले कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडत आहेत. पत्रकाराच्या लेखणीची एक वेगळीच धार आहे, लेखणीत ताकद असते, हे अनेकदा अधोरेखित झाले आहे, अगदी आणिबाणी च्या काळात देखील काही वृत्तपत्रे, पत्रकार यांनी सरकारच्या ताकदीपुढे मान झुकवली नाही.

वास्तविक पत्रकारिता ही सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून, निस्वार्थीपणे आणि निर्भिडपणे स्वेच्छेने स्विकारलेली व्रत आहे,मात्र कालानुरूप सगळेच संदर्भ बदलले आहेत आणि पत्रकारितेवर देखील अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पत्रकारिता देखील राजकीय पक्ष, नेते, जात, पात, धर्म, पंथ, गट-तट यात विभागली गेली आहे, अनेकजण प्रलोभनाला बळी पडत आहे त्यामुळे पाकिट संस्कृती फोफावली आहे, अनेक पत्रकार तोडपाणी चा नसता उद्योग करुन पत्रकारिता बदनाम करीत आहेत,तर पत्रकारिता हा काहींसाठी पैसा कमावण्याचा धंदा झाला आहे,तर पत्रकारितेतील काही राजकीय पक्षांची प्रचार पत्रे आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया हा जणु एखाद्या राजकीय पक्षाचा प्रवक्ता बनला आहे हे कटु वास्तव आहे. यामुळेच गेल्या काही वर्षांपासून पत्रकारितेत'गोदी मिडिया ', बिकाऊ मिडिया, हे वाक्प्रचार ऋढ झाले आहेत. वर्तमान पत्र वा एखादे चॅनल चालविणे हे खर्चिक झाले आहे त्यामुळे मिडिया हा पैसे वाल्यांच्या हातात जात आहे आणि अनेक उद्योगपती, कार्पोरेट कंपन्यानी मिडीयावर कब्जा केला आहे आणि त्यामुळे विकाऊ पत्रकारिता मोठ्याप्रमाणावर फोफावत आहे. सगळा पैशाचा खेळ बनला आहे आणि सगळी सोंगे वठविता येतात पण पैशाचे सोंग कुणालाही वठविता येत नाही हे ही तितकेच खरे आहे. पत्रकारांनी सरकारला प्रश्न विचारला पाहिजे, विविध प्रश्नांना वाचा फोडली पाहिजे, मात्र आजच्या घडीला चित्र काहिसे वेगळे दिसते. तर वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक मिडिया यांचा आर्थिक ताळमेळ बसतांना सरकारची मर्जी, जाहिराती, सोयीसुविधा यांचा विचार करावाच लागतो हे देखील तितकेच खरे आहे. असे असले तरीही आज अनेक पत्रकार आपली जबाबदारी ओळखून पत्रकारितेच्या धर्माला जागुन, कोणतीही अपेक्षा न बाळगता कुठल्याही आर्थिक लोभाची अपेक्षा न ठेवता, सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून काम करत आहेत. पत्रकारांना ना कुठला आर्थिक मोबदला मिळतो ना सामाजिक सुरक्षा. समाजाला, जनतेला पत्रकारितेकडुन फार अपेक्षा आहेत, जनतेच्या प्रश्नावर पत्रकारांनी लढावे, त्यांनीच समस्या मांडाव्यात, त्यांनीच व्यवस्थेशी झगडावे, सरकारशी लढावे ही जनतेची रास्त अपेक्षा आहे आणि अनेक पत्रकार हे आपले तन मन धन अर्पण करून आपले आयुष्य खर्ची घालतात देखील. मात्र अनेकदा समाजातील वाईट प्रवृत्तीं कडुन, व्यवस्थेकडून पत्रकारांना लक्ष केले जाते, अनेकदा पत्रकारिता जिवावर देखील बेतते, अशावेळी समाजाने, जनतेने देखील अशा पत्रकारांच्या पाठिशी उभे राहुन त्यांना बळ देणे गरजेचे आहे. पत्रकार संरक्षण कायदा आहे मात्र त्याचा फायदा होतांना दिसत नाही.आज अनेक लहान वृत्तपत्रे, युट्यूब चॅनल च्या माध्यमातून पत्रकारिता पुढे नेण्याचा प्रयत्न अनेकजण आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत.अशाही परिस्थितीत आज अनेक पत्रकार काम करीत आहेत आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र सरकार तर्फे तसेच अनेक सामाजिक संस्था, वृत्तपत्रात संस्था यांच्या कडुन अनेकांना सन्मानित करुन त्यांच्या पाठिवर कौतुकाची थाप मारली जाते आणि पत्रकारांसाठी ती फार प्रेरणादायी ठरते.

आजच्या घडीला लोकशाहीच्या संसद, कार्यपालिका,, न्यायव्यवस्था, आणि प्रिंट तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया हे चारही स्तंभ डळमळीत झाले आहेत, हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक आणि नुकसानकारकच आहे. मात्र पत्रकारिते कडुन अजुनही अपेक्षा आहे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

**भक्कमस्तंभ..**

पत्रकारितामहत्वपूर्ण
रे चतुर्थ भक्कमस्तंभ
स्तंभित करे जगतास
असा असे अक्षरारंभ

चोखसोने बावनकशी
शुचितेचा करे अवलंब
हाकजरी क्षीण ऐकली
धावत जातो अविलंब

बाळकृष्णजांभेकरांनी
केला याज्ञिककार्यारंभ
स्व सुख आहुती अर्पून
देई पत्रका मौलिकडंभ

सर्वार्थाने सावरले छान
रे अक्षरांचे अवघेकुटुंब
अध्याय रचलेकर्तृत्वाचे
अणू समान शक्ती टिंब

आसमंत मिळेमोकळा
उधळे प्रकाश सूर्य बिंब
खडकाळ मृत मातीवर
कसे जनले अद्भुतकोंब

आजकाल गल्ली बोळे
कैक उगवले उपट सुंभ
पत्रकांचा सुळ सुळाट
कुणीही धन दांडगे कुंब

स्वार्थ प्रेरित धनकांक्षी
सन्मार्गाचा करी विडंब
दावणी बांधून लेखणी
मातवी सत्तेचा अवडंब

प्रयासेआपणा लाभला
सदाक्षराचा अमृतकुंभ
तहानल्या चातक मुखी
हा स्त्रवावा प्रत्येक थेंब

पत्रकारिताव्रतस्विकारे
पाहून आपले प्रतिबिंब
डागळूनका पावनकार्य
उजळावे सत्व अहर्बिंब

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज

# सिद्धार्थ महाविद्यालय आयोजित ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा १९४ वा जयंती उत्सव संपन्न

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०५, मुंबई :** सिद्धार्थ महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा व साहाय्यक प्राध्यापिका राधा कनकामल्ला यांच्या पुढाकाराणे यावर्षी प्रथमच ३ जानेवारी २०२५ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४व्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजच्या सभागृहात सकाळी साडेअकरा वाजता करण्यात आले होते.

ज्युनिअर कॉलेजच्या जेष्ठ प्राध्यापिका निर्मला कांबळे यांना प्रमुख व्याख्यात्या म्हणून आमंत्रित केले होते. सर्वप्रथम प्रथेप्रमाणे सावित्रीमाईंसह, बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फूले यांच्या प्रतिमांना व्यासपिठावर उपस्थित उपप्राचार्य डॉ. समिर ठाकूर, प्रा. छाया पावसकर, प्रा. बाभळगांवकर व डॉ. विष्णू भंडारे यांनी पुष्पहार अर्पण केला, तसेच मेनबत्ती, अगरबत्तीचे प्रज्वलन करून मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली.

निर्मला कांबळे यांनी क्रांतीज्योती सावित्रीम ईंच्या समाजकार्याबद्दल व विशेषता महिलांच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याचे सविस्तर विवेचन मांडले. ज्या काळात महिलांना मनुस्मृती नुसार शिक्षण घेण्यास बंदी होती व त्यांना समाजात दुय्यम व पशूप्रमाणे वागणूक दिली जात होती,



अशा काळात महिलांना शिक्षीत व साक्षर करण्याचे फार मोठे काम सावित्रीबाईंनी १८व्या शतकात ज्योतीबा फूले यांच्या भक्कम पाठिंब्याने व सोबतीने सुरू केले, त्यासाठी प्रस्थापित ब्राम्हण समाज्याच्या लोकांकडून त्यांना टिका व अनेक प्रकारे आत्याच्यार सहन केले.

आज भारतातील असंख्य स्त्रिया शिकून स्वतः च्या पायावर उभ्या आहेत व पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, शैक्षणिक व नोकरीच्या ठिकाणी अशा सर्व क्षेत्रात शिक्षिका, डॉक्टर, वकील, इंजिनियर अशा विविध उच्च पदावर कार्यरत आहेत ते फक्त सावित्रीबाईंनी आम्हाला शिक्षणाचा हक्क मिळवून दिल्यामुळेच शक्य झाले आहे, असे निर्मला मॅडम यांनी आवर्जून उपस्थितांना सांगितले. तसेच त्या स्वतः एक प्राध्यापिका झाल्या हे केवळ आणि केवळ सावित्रीमाई मुळेच हे सांगताना त्यांना अक्षरशः गहिवरून आले.

कार्यक्रमाच्या दुसर्या सत्रात उपस्थित विद्यार्थि व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांसाठी सावित्रीम ाईंच्या संपूर्ण जीवनकार्याविषयी प्रश्नमंजूशा आयोजित केली होती, ज्यामध्ये प्रत्येकांनी ३ प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित होते. यामध्ये ज्यांनी भाग घेऊन किमान दोन प्रश्नांची बरोबर उत्तरे दिली त्यांना उत्तेजनारार्थ बक्षिसे देण्यात आली. प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे समालोचन प्रा. राधा व प्रा. सुनयना यांनी संयुक्तपणे यशश्विरित्या केले.

तसेच सदर कार्यक्रमात प्रा. उमाजी जाधव, प्रा. संजयकुमार बोरसे, डॉ.भावना राठोड, आयु राजू रोकडे यांनीदेखील सावित्रीमाईंच्या जीवनावर त्यांचे विचार व भावना व्यक्त केल्या. आमचे प्राचार्य डॉ. यु. एम. मस्के काही कारणास्तव उपस्थित राहू शकले नाहीत याबद्दल दिलगिरी व्यक्त केली व सर्वांचे विशेषता महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा प्रा. राधा कनकमल्ला यांचे कौतूक केले, कार्यक्रमाचा समोरोप सामुहीक राष्ट्रगीत गाऊन करण्यात आला.

# अघोरी विद्येच्या नावाखाली अश्लील चाळे करणाऱ्या भोंदु बाबाला कल्याणमधून अटक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, कल्याण (ठाणे) :** राज्यातील म हिलांवरील अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसू येत आहेत. काही महिन्यांपूर्वी बदलापूरमधील एका शाळेत चिमुकलीवर लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर पोलीस प्रशासन खडबडून जागे झाले असतानाही अत्याचाराच्या घटना अद्याप देखील घडतच आहेत. गेल्याच आठवड्यात कल्याणमध्ये एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी आरोपीला अटकही करण्यात आली असून कठोरता कठोर शिक्षा व्हावी, म्हणून विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यातच, आता कल्याणमध्ये आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अघोरी विद्येच्या नावाखाली, तिच्या समस्या सोडविण्याच्या नावाने या मुलीसोबत भोंदूबाबा कडून अश्लील चाळे करण्यात आले होते. याबाबत स्वत: मुलीने पोलिसांत



फिर्याद दिली असून पुढील तपास सुरू आहे.

कल्याण जवळील आंबिवली परिसरात हा धक्कादायक प्रकार घडला आहे. येथील एका बाबाने अघोरी विद्येच्या नावाखाली मुलीसोबत अश्लील चाळे केले. भोंदू बाबाच्या संतापजनक कृत्याने पीडित म ुलीने थेट पोलिसांत धाव घेतली. या भोंदू बाबाचे नाव अरविंद जाधव असून खडकपाडा पोलीस ठाण्यात भोंदूबाबा विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

मी एका बाबाकडे माझ्या फॅमिली प्रॉब्लेम घेऊन गेले होते, पण त्या बाबाने माझ्याशी घाणेरडे कृत्य केले. मी माझ्या नातेवाईकाला घेऊन बाबाकडे गेले होते.

मात्र, बाबाने नातेवाईकाला बाहेर बसायला सांगितले व मला एकटीला खोलीत ते घेऊन गेले. तू खूप प्रॉब्लेम मध्ये आहेस, मी तुझी समस्या सोडवितो असे म्हणत बाबाने माझ्या संपूर्ण शरीराला स्पर्श केला, प्रायव्हेट पार्टलाही हात लावला, अशी धक्कादायक घटना पीडित मुलीने माध्यमांशी बोलताना सांगितली आहे. दरम्यान, याप्रकरणी आपण पोलिसांत फिर्याद दिली असून आरोपी बाबावर गुन्हा दाखल केला आहे. मात्र, नव्या कायद्यानुसार आपण आरोपीला अटक करु शकत नाही,असे पोलिसांनी म्हटले आहे.

दरम्यान मुलीच्या तक्रारीवरुन विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, खडकपाडा पोलिसांकडून आवाहनही करण्यात येत की, म हिलांसंदर्भात काहीही अडचण असल्यास पोलिसांशी संपर्क साधवा, असे कल्याण-खडकपाडा पोलीस स्टेशनचे वपोनी डॉ.अमरनाथ वाघचौरे यांनी म्हटले आहे. तसेच, अद्यापपर्यंत दुसरी तक्रार आली नसून दाखल गुन्ह्यानुसार आपण तपास करत असल्याचेही वाघचौरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## दर्पण दिनानिमित्त आज जिल्हाधिकाऱ्यांचे व्याख्यान

### नियोजन भवनमध्ये ४ वाजता पत्रकार दिन कार्यक्रम

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, नांदेड :** सोमवार, दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा माहिती कार्यालयाने पत्रकार दिनाचे आयोजन केले आहे. नियोजन भवन येथे दुपारी ४ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि बातमीदारी' या विषयावर पत्रकारांना संबोधित करणार आहेत. नांदेड जिल्हा प्रशासन, नांदेड पोलीस प्रशासन, जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटना व जिल्हा माहिती कार्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यासाठी, दर्पण दिनाच्या पर्वावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ६ जानेवारी मराठी पत्रकार दिन म्हणून सर्वत्र साजरा होतो. या दिनाचे औचित्य साधून पत्रकारांसोबत प्रशासनाचा संवाद आयोजित करण्यात आला आहे. यावेळी 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि बातमीदारी', या विषयावर जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा बातमीदारीमध्ये कशा पद्धतीने वापर करता येईल, त्याचे फायदे व तोटे याबाबत ते मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार उपस्थित राहणार असून ते देखील पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. सोमवार, दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता जिल्ह्यातील विविध संघटनांशी, माध्यम संस्थांशी, केंद्राशी संबंधित सर्व प्रिंट इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातील पत्रकार बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांनी केले आहे.

## मेट्रो प्रकल्प कामांचे वेळापत्रक करा; मुख्यमंत्री फडणवीस यांचे आदेश



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील (एमएमआरडीए) सर्व मेट्रो प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे वेळापत्रक नव्याने तयार करावे. कोणत्याही मेट्रोमार्गाला विलंब न होता पुढील वर्षापासून दरवर्षी किमान ५० किमी मेट्रोमार्ग कार्यान्वित होईल, यासाठी नियोजन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक ०४ जानेवारी २०२५ रोजी येथे दिले. कारशेडशिवाय मेट्रो प्रकल्प सुरू करण्यासाठी ही पर्यायी उपाययोजना करण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले.

फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एमएमआरडीएची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृहात झाली. त्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि विविध खात्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आरे कारशेड प्रकल्प रखडल्यामुळे मेट्रो ३ प्रकल्पामध्ये अनेक अडचणी आल्या. पण आता एक टप्पा सुरू झाला असून अन्य टप्प्यांची कामे सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर फडणवीस म्हणाले, जगात अनेक ठिकाणी कारशेडशिवाय मेट्रो प्रकल्प सुरू होत आहेत. त्यासाठी विविध प्रयोग व तात्पुरत्या पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहेत. त्याचा अभ्यास करून येथील मेट्रोमार्गही कारशेड होईपर्यंत न थांबविता कार्यान्वित करावेत, असे निर्देश फडणवीस यांनी दिले. पुढील काही वर्षातील नियोजित मेट्रो प्रकल्पांचा आढावा घेऊन कारशेडसाठी आतापासूनच जागा आरक्षित करण्याचे नियोजन करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. यावर्षी किमान २३ किमी मेट्रोमार्ग सुरू होईल आणि मेट्रो तीनमुळे त्यात २०-२५ किमीची भर पडणार आहे. पण पुढील वर्षीपासून दरवर्षी किमान ५० किमी मेट्रोमार्गाची भर पडेल, यादृष्टीने नियोजन करून कामाचा वेग वाढवावा, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या.

## त्यामुळेच मी तीन वेळा मुख्यमंत्री होऊ शकलो




**दि.५, नागपूर :** भारतीय जनता पक्ष हा जगातील पहिल्या क्रमांकाचा पक्ष असून त्यात वरपासून खालपर्यंत लोकशाही पद्धतीने कामकाज चालते. त्यामुळेच सामान्य कार्यकर्ता हा सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतो, एक साधा चहा विक्रेता देशाचा पंतप्रधान होऊ शकला आणि मीसुद्धा तीन वेळा मुख्यमंत्री होऊ शकलो ते केवळ आणि केवळ पक्ष आणि कार्यकर्त्यांमुळेच, त्यामुळे पक्षात संघनेला अधिक महत्व आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस म्हणाले.

नागपूरमध्ये रविवारी शहर भाजपतर्फे आयोजित पक्षाच्या सदस्य नोंदणी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते बुथपातळीवर उत्तमप्रकारे नोंदणी करणाऱ्या काही कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. हा धागा पकडून फडणवीस यांनी कार्यकर्ते, संघटना आणि सत्ता याची सांगड कशी घातली जाते व यात कार्यकर्ता हा किती महत्वाचा असतो हे सांगितले. फडणवीस म्हणाले, भारतीय जनता पक्ष. भाजप हा देशातील पहिल्या क्रमांकाचा पक्ष आहे. ११ कोटी सदस्यांची नोंदणी झाली आहे. बाकी सर्व पक्ष खासगी आहे. कुठल्या तरी कुटुंबाशी त्यांची बांधिलकी आहे. भाजप मात्र कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. वरपासून खालपर्यंत लोकशाही पद्धतीने येथे नेत्यांची निवड केली जाते. कार्यकर्त्यांतून नेत्याची निवड केली जाते. त्यामुळेच एक चहा विक्रेता प्रथम गुजरातचा मुख्यमंत्री आणि नंतर देशाचा पंतप्रधान होऊ शकला. मीसुद्धा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून राजकीय जीवनाला सुरुवात केली. व मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचलो. तीनवेळा या पदावर जाण्याचा सन्मान केवळ कार्यकर्त्यांमुळे मिळाला असे फडणवीस म्हणाले. कार्यकर्त्यांमुळेच भाजपला महाराष्ट्रात सलग तीन निवडणुकांमध्ये शंभरहून अधिक जागा मिळाल्या. याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**महाराष्ट्रात विक्रमी नोंदणी होणार**

महाराष्ट्राचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना दीड कोटी सदस्य करण्याचे आश्वासन दिले आहे. सध्या एक कोटी सदस्य नोंदणी आहे. ती दीड कोटी करणे अशक्य नाही. डिजिटल नोंदणीमुळे हे काम अधिक सोपे झाले आहे. डिजिटल नोंदणीमुळे कार्यकर्त्यांचे संपर्क नंबर पक्षाकडे नोंदवला जातो व त्या माध्यमातून पक्षाची ध्येयधोरणे त्यांच्यापर्यंत पोहचवणे शक्य होते. संपर्क आणि संवाद या दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. सदस्य नोंदणीच्या माध्यमातून संपर्क केला जात आहे, त्यापुढची पायरी ही संवादाची आहे, असे फडणवीस म्हणाले.

**नागपूर महानगराचे सात लाखाचे लक्ष्य**

नागपूर महानगर भाजपने सात लाख सदस्य नोंदणीचे लक्ष्य निर्धारित केल्याचे पक्षाचे शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी सांगितले. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून प्रत्येकी एक लाख आणि संपूर्ण महानगरातून एक लाख असे एकूण सात लाख सदस्य नोंदवण्यात येणार आहे.

# नगरमधील गॅस जोडणी संदर्भात खा.लंके यांनी वेधले लक्ष

## पेट्रोलियम कंपनी अधिकाऱ्यांसह बैठक आयोजित करण्याच्या सूचना

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** नगर शहरात भारत पेट्रोलियम कंपनीमार्फत घरगुती गॅस जोडण्या देण्याचे काम ९ सप्टेंबर २०१८ पासून सुरू असून अद्यापही संपूर्ण शहरात गॅस जोडण्या देण्याचे काम पुर्ण झाले नसल्याबाबत खासदार निलेश लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांचे लक्ष वेधले आहे.

यासंदर्भात भारत पेट्रोलियम कार्पोरेशनच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करण्याची सूचना खा.



निलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनादवारे केली आहे. या निवेदनात खा.लंके यांनी नमुद केले आहे की, भारत पेट्रोलियम कार्पोरेशनच्या वतीने नगर शहरात २०१८ पासून घरगुती गॅस जोडणी देण्याचे काम सुरू असले तरी हे काम अद्याप ही अपुर्ण आहे. त्यासंदर्भात आपणाकडे स्थानिक नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

गेल्या ६ वर्षांपासून हे काम सुरू असताही हे काम पुर्ण झालेले नाही. ही योजना केंद्र सरकारची असून संपूर्ण शहरात गॅस जोडणी देणे हे केंद्र सरकारचे उद्दीष्ट होते. परंतू भारत पेट्रोलियम कार्पोरेशनने हे उद्दिष्ट अपूर्ण ठेवलेले आहे. संसदीय हिवाळी अधिवेशनादरम्यान आपण स्वतः केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरजितसिंह पुरी यांची भेट घेत या प्रश्नासंदर्भात चर्चा केली होती. त्यावेळी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करून या प्रश्नातून मार्ग काढण्यासंदर्भात मंत्री हरजितसिंह पुरी यांनी सुचित केले होते. त्या अनुषंगाने कंपनीच्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्याची सूचना खा. लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना केली आहे.

# डीप क्लिनींगद्वारे हवा गुणवत्ता सुधारणेवर भर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रातील हवा गुणवत्तेमध्ये सुधारणा व्हावी हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी करण्याकडे विशेष लक्ष देत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ३० डिसेंबरपासून सखोल स्वच्छता मोहीम (डीप क्लिनिंग ड्राइव्ह) राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत ८ ही विभाग कार्यालय क्षेत्रात दिनांक निहाय विविध रस्त्यांच्या सखोल स्वच्छतेचे नियोजन करण्यात आले असून अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपआयुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ उपआयुक्त संतोष वारुळे तसेच परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्यासह विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली संबंधित अधिकारी, कर्मचारीवृंद तसेच स्वच्छताकर्मी यांच्या माध्यमातून धुळीचे प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने साफसफाई करण्यात येत आहे.



यामध्ये रस्ते, पदपथ यांच्या कडेला साठून राहिलेली गाळाची माती व कचरा यांची हॅंडब्रशने व त्यानंतर प्रक्रियाकृत पाणी मारुन यांत्रिकी वाहनाने साफसफाई करण्यात येत आहे.

तसेच फॉगींग मशीनद्वारे हवेत पाण्याची फवारणी करुन धूळीचे प्रमाणही कमी करण्यात आले आहे. पदपथाच्या बाजूच्या भिंती, कुंपण, शिल्पाकृती यांची ही साफसफाई करण्यात आली आहे. दिनांक ०४ जानेवारी २०२५ रोजी बेलापूर विभागात क्रित फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या सहयोगाने सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे यांच्या माध्यमातून बेलापूर जेट्टी, सेक्टर १५ याठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

तसेच हावरे सर्कल ते अपोलो सिग्नल या मुख्य रस्त्यावरील व परिसरातील सखोल स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले. वाशी विभागातही सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली जैन मंदिर ते संतोष डेअरी, सेक्टर ९ए व १०ए या रस्त्यावर, पदपथावर व परिसरात सखोल स्वच्छता करण्यात आली.

कोपरखैरणे विभागातील तीन टाकी ते वैकुंठधाम या परिसरात सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनिल काठोळे यांच्या नियंत्रणाखाली त्याचप्रमाणे दिघा एमआयडीसी तील व्होडाफोन कंपनी ते स्मिथ हॉटेल या रस्त्यावर सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी भरत धांडे यांच्या नियंत्रणाखाली सखोल स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.

फ१३ जानेवारीपर्यंत दररोज अशा प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहीमा ८ ही विभाग कार्यालय क्षेत्रात नियोजित कृती आराखड्यानुसार राबविण्यात येणार आहे.

# माळेगाव यात्रा ही शेतकऱ्यांच्या परिश्रमांचा सन्मान करण्याचे व्यासपीठ

## आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे प्रतिपादन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, नांदेड :** शेतकरी व पशुपालक आपल्या जनावरांवर म ुलाप्रमाणे प्रेम करतो, त्यांची काळजी घेतो. माळेगाव यात्रा ही केवळ उत्सव नसून शेतकऱ्यांच्या परिश्रमांचा सन्मान करण्याचे व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.




जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने श्रीक्षेत्र माळेगाव येथे पशु, अश्व, श्वान, शेळी, कुक्कुट प्रदर्शन व दुग्ध स्पर्धेचे निकाल जाहीर झाले. आज माळेगाव येथे बक्षीस वितरण आ. प्रतापराव चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, यात्रा सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पाडीलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देश ुख, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, गट विकास अधिकारी दशरथ आडेराघो, कल्याणकर सावकार सूर्यवंशी, डॉ. प्रमोद पाटील चिखलीकर, आनंदराव ढाकणीकर, सरपंच प्रतिनिधी हनमंत धुळगंडे, बाळू बाबर, रोहीत पाटील अंडगेकर, अनिल बोरागावकर, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, पोलीस निरीक्षक संजय निरपटेवार, डॉ. सुनील गिरी, डॉ. निरंजन बागल, डॉ. उपेंद्र गायकवाड, आदींची यावेळी उपस्थिती होती.

पुढे ते म्हणाले, माळेगाव यात्रेचा पशुपालकांच्या मेहनतीला व शेतकऱ्यांच्या कष्टाला सलाम करणारा वारसा कायम राखत यंदा लाल कंधारी वळूसह या वर्षापासून मादी गटासाठी देखील चॅम्पियनशिप पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. माजंरमचा लाल कंधारी वळू तर हासूळची गाय ठरली चॅम्पियन जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेतील बक्षीस वितरण करण्यात आले.

या स्पर्धेत लाल कंधारी वळू मध्ये नायगाव तालुक्यातील माजंरम यथील पशुपालक श्रीपती देवराव शिंदे यांचा वळू माळेगाव चॅम्पियन तर सुमीत्रा रामेश्वर सुर्यकांबळे यांची देवणी गाय म ाळेगाव चॅम्पियन ठरली आहे. या दोन्ही पशुपालकांना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते अनुक्रमे लाल कंधारी वळू पालकास १ लाख रुपये तर गाय पालकास रुपये ५० हजाराचा धनादेश व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. यावेळी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धातील विजेत्यांना यावेळी रोख रक्कम व प्रमाणपत्र वाटतप करण्यात आले.आज शेवटच्या दिवशी कुस्त्यांचा फड आणि अश्व शर्यतही माळेगाव येथे पार पडली. २९ डिसेंबर पासून या ठिकाणी कृषी, माती, शेती, पशुशी संबंधित विविध उपक्रम जिल्हा परिषद नांदेड लोहा पंचायत समिती व माळेगाव ग्रामपंचायत मार्फत राबविण्यात आले. ऐतिहासिक व पारंपारिक यात्रेनिमित्त विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. आज शासकीय कार्यक्रमाच्या आयोजनाचा समारोप करण्यात आला आहे.

# नवनाथ ठाकुर 'कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार-२०२५' ने सन्मानित

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, कल्याण (ठाणे) :** शुक्रवार दि.०३ जानेवारी २०२५ रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्या १९४ व्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र प्रदेश युवा कांग्रेस सरचिटणीस, रायगड जिल्हाध्यक्ष, लोकप्रिय युवा नेते अड.उमेशदादा मधुकर ठाकुर यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त राज्यातील कला, क्रिडा, साहित्य, वैद्यकिय, कृषी, सामाजीक, शैक्षणिक, सांस्कृतिक ,पत्रकारीता अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल एकुण ७५ गुणीजनांना 'कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार-२०२५' देऊन सन्मनीत करण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील आगरी समाजातील कवी,लेखक नवनाथ ठाकुर यांनाही साहित्यिक योगदानाची दखल घेऊन 'कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार -२०२५ ' ने सन्मानीत करण्यात आले. कार्यक्रमासाठी भाई जगताप (आमदार विधान परिषद),हेमंतदादा ओगले (आम दार),रविन्द्र घंगेकर (आमदार) तसेच महाराष्ट्राचे सुप्रसिध्द गायक,बीग बोस संतोष चौधरी (दादुस) व सत्कारमूर्ती अड.उमेशददा ठाकुर या मान्यवरांची उपस्थिती लाभली.



साहित्यिक, कवी, निवेदक, कलाकार, गीतकार तसेच आगरी समाजातील लग्नमधील 'धवलारीन... एक आगरी पुरोहित!' या पुस्तकाचे लेखक श्री.नवनाथ ठाकुर यांना या अगोदरही विविध २३ पुरस्कार व विशेष ठिकाणी सन्मानीत केले आहे. एफ के.हिंदी न्यूजवर तीन वेळा मुलाखत व 'लक्ष' या धर्लीलिस चनेलवरही मुखाखत झालेली आहे. परेलिसेसच्या भयंकर आजारावर मात करत नवनाथ ठाकुर यांनी लेखन सुरूच ठेवले.

नवनाथ ठाकुर यांची एक अभ्यासु व्यक्तिमत्त्व म्हणूनच ओळख आहे. त्यांनी आतापर्यंत २००० हून अधिक कविता, २०० हून अधिक चारोळ्या, प्रवासवर्णने, गावांतील ऐतिहासिक वर्णन, गावची 'साथ', देवी (बाया)पोवणे, कुलदैवतविधी बद्दल माहिती, लग्न कार्यातील विकृत हळदी-समारंभ यांवर लघू लेखांतून शाब्दिक प्रहारही केलेला आहे. लेखक नवनाथ ठाकुर यांनी विविध धार्मिक ग्रंथांचा सखोल अभ्यासही केला आहे. गीता, रामायण, उपनिषदे तसेच विविध महान चरित्रांचाही अभ्यास केला आहे. त्यांचा अध्यात्मिक प्रवास यशस्वीपणे सुरू आहे. जीवनाकडे विधायक दृष्टिकोन ठेवून बघणे. हा त्यांचा पायंडा आहे.

'नांगर खांद्याव घेऊनशी मी चाललो शेताव.....'हे आगरी शेतकरी गीत व 'दिंडी चालली दिंडी चालली' हे गीत रेकार्डिंग. 'कधि संपून जाईल?' कोरोना काळातील एका गीतामध्ये सह परिवार कलाकार म्हणून सहभाग.

त्यांच्या साहित्याची विविध वर्तमान पत्रकांनीही नोंद घेतली. तसेच त्यांचा 'काव्य इंद्रधनु' नावाचा प्रातिनिधीक काव्यसंग्रह प्रकाशीत झालेला आहे. ज्यांत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध १० कवी-कवयित्रींच्या निवडक कविता प्रकाशीत केलेल्या आहेत. सदर पुरस्काने नवनाथ ठाकुर यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

